सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रथमली/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ९९६ ठ. क्र. २२९ दि. ९/११/२०१५ राजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर शहरातील अपंगाना शासनाच्या योजनांची माहिति देणेसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करणे, (मुकबधिर, अंध अस्थिव्यंग, कर्णबधिर, मतीमंद व बहूव्यंग) या सहा प्रकारच्या अपंग व्यक्तीसाठी विशेष कार्यक्रम घेऊन मा.शासनाच्या विविध योजनांची माहिती देणेबाबत प्रस्तावात नमूद प्रमाणे १ ते १३ योजनाबाबत योजनेचे स्वरुप आवश्यक कागदपत्रे शर्ती व अटीचा ऊहापोह केला असून संगणक विभागाकडून ४२०१ अपंग व्यक्तीचे डाटा एन्ट्रीची माहिती प्राप्त झाली असून त्या अनुंषगाने प्रस्तावात नमूद प्रमाणे साहित्याचे प्रकार अलिमकोचे दर, बाजारभावाचे दर, कमीत कमी दर असे एकूण र.रु.२,११,५७,८९२/- इतका अंदाजेखर्च अपेक्षित आहे. असे नमूद असून तसेच सन २०१५-१६ च्या "अपंग सहाय्य योजना" यातील तपशीलात नमूद प्रमाणे अ.क्र. २,५,६,९,१० चा निधी या "अपंग सहाय्य योजना" च्या अन्य योजना मध्ये वर्ग करणे असे ही नमूद असून प्रस्तावात नमूद केल्यानुसार सदर कामी १ कोटी बजेट तरतूद आहे. या योजनातील अ.क्र.१२ मध्ये विशेष व्यक्तीना (अपंग) मोफत बस प्रवासासाठी सो.म.पा. परिवहन उपक्रम करिता २६ लाख तरतूद आहे. ही रक्कम सो.म.पा परिवहन उपक्रमास देणे आवश्यक आहे. ही बाब पाहता (अपंग) योजनेसाठी र.रु.७४ लाख इतकी रक्कम शिल्लक राहते तथापि बजेट उपलब्धतेनुसार बजेट तरतूदीच सिमितीच सदरची योजना राबवावी लागणार आहे. सबब सदर प्रस्तावास धोरणात्मक मान्यता घेणेकामी मा.कामगार व समाजकल्याण समिती मार्फत मा.सर्वसाधारण सभेकडे सादर करणेस व मान्यते अंती अपंगाचा मेळावा भरविणेची पुढील कार्यवाही ठेवता येईल याप्रमाणे मा.आयुक्त यांचे दिनांक २७/८/२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. कामगार व समाज कल्याण समिती ठराव क्र. २, दिनांक ८-९-१५ चे शिफारसीनुसार मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१९८ ठ. क्र. २२२
दि. १४/१०/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



शहराचा पाणी पुरवठा सुधारणाकामी एकरुख उपसा जलसिंचन योजना कारंबा पंपगृह परिचालनाचा व देखभाल दुरुस्तीची खर्च मनपा कडून करणेस प्रस्तावात नमूद कारणास्तव एकरुख तलाव योजना ही जवळची व सदर योजनेवरुन येणारे पाणी गुरुत्वीय प्रणालीद्वारे म्हणजेच By Gravity येत असलेने, सदर तलावातून सोलापूर शहरासाठी कायमस्वरुपी पाणी उपलब्ध झालेस त्या अनुषंगाने सोलापूर शहरासाठी सदरहू एकरुख जलाशयातून साधारणत: दैनंदिन ५० ते ६० दशलक्ष लिटर क्षमतेची अन्य पूरक पाणी पुरवठा योजना मंजूर होवून त्याप्रमाणे पाटबंधारे विभागाकडून पाणी आरक्षण होणे आवश्यक आहे. एकरुख उपसा सिंचन योजना, कारंबा पंपगृह योजना पाटबंधारे विभागाकडून पूर्ण झाल्यानंतर परिचालनाचा व देखभाल दुरुस्तीचा दरवर्षी खर्च र.रु. ३,५०,८८,२५०/- होणार आहे. तरी एकरुख उपसा सिंचन योजना कारंबा पंप गृह योजना पाटबंधारे विभागाकडून पूर्ण झाल्यानंतर परिचालनाचा व देखभाल दुरुस्तीचा खर्च (मनपा हिश्श्यास येणारी) मनपा कडून करणेस तयार असलेबाबत मा. सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता मिळणेस्तव व तसेच याकामी जलसंपदा विभागाकडे बैठक आयोजित करणे, त्या अनुषंगाने पत्रव्यवहार करणे इ.बाबतचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना देणेस मा. सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता मिळणेस्तव प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रकरण फेर सादर करणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. २९-८-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुल्तो/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१९९.ठ. क्र. 223
दि. १४/१०/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ४८ अ मध्ये ए.जी. पाटील कॉलेज ते लोकू तांडा येथे पाण्याची पाईप लाईन टाकणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित ठिकाणचे राहिलेले उर्वरीत कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. १७ र.रु. १६,८०,५५०/- इतकेचे तयार केले असून सदरकामी सन २०१५-१६ पाण्याची पाईप लाईन घालणे व टाक्या बांधणे या बजेट तरतूदीमधून बजेट उपलब्ध होवून मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ३१-८-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मामुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २००. ठ. क्र. २२४
दि. १४/१०/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



राज्य ग्रंथालय परिषदेवर नामनियुक्त करण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हा परिषदांवरील सुयोग्य सदस्यांची नावे कळविणेबाबत प्रस्तावात नमूद स्थानिक स्वराज्य संस्थेतील नियुक्त झालेल्या तीन (०३) सदस्यांची नावे पाठविणेबाबत मा. सहाय्यक ग्रंथालय संचालक पुणे यांचे पत्र जा.क्र.का१-१/संग्रसंपु/२०१५-१६/१८२-२४०, दिनांक ५-८-२०१५ ने कळविले असून, राज्य ग्रंथालय परिषदेवर नामनियुक्त करणेकामी मा. सदस्यांची नावे कळविताना मा.मनपा सर्वसाधारण सभेकडून निश्चित केलेली नावे कळविणे योग्य होईल. तरी सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. प्र. आयुक्त यांचे दि. ९-९-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्रकरणी सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वपक्षीय मा. सदस्यांची नांवे समाविष्ठ करणेकामी मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासीक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 209 ठ. क्र. 235
दि. 9.11.2015 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य उपविधी -२०१५ बाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव शहर स्वच्छ व सुंदर होणेकरिता नागरिकांचीही जबाबदारी आहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण २९ कलम ४५८ नुसार महानगरपालिकेने शहरांतील नागरिक, निवासी, बिगर निवासी, संस्थात्मक उद्योग व्यवसाय आस्थापना इत्यादीकरिता घनकचरा, सांडपाणी, गटारी व इतर स्वच्छता विषयक बाबींचे पालन करण्यांत येते. तसेच पालन न करणा-या व्यक्ती/संस्था यांच्या विरोधात कार्यवाही करणेबाबत स्वत:ची उपविधी ठरवून त्याची प्रशासनाकडून काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यास्तव प्रस्तावा सोबत जोडलेले उपविधी प्रकरण १) सर्वसाधारण माहिती २) व्याख्या ३) कच-याची वर्गवारी ४) कचरा निर्माण करणारे स्त्रोत ५) घनकचरा विलगीकरण ६) घनकच-याची साठवण ७) घनकच-याचे वितरण व संचयन ८) घनकच-यावरील प्रक्रिया आणि त्याची विल्हेवाट ९) द्रव व कचरा व्यवस्थापन १०) पाणी, व्हेक्टर आणि अन्नपदार्थ यामधून फैलावणा-या आजारांचा प्रतिबंध ११) उपविधीखालील अपराध १२) उपविधीमधील तरतुदींची अंमलबजावणी व अनुसूची -१ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४८१ (ब) नुसार या उपविधी अंतर्गत अपराध अथवा गुन्हा आणि तडजोड शुल्क/प्रशासकीय शुल्क व सर्वसाधारण अपराध/गुन्हे आणि तडजोड शुल्क बाबत सदरचा मसुदा मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यांत येईल त्यानंतर मा. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे सार्वजनिक प्रसिध्दी देऊन नागरिक/संस्था यांचेकडून सूचना/हरकती मागविणेत येतील व त्यानंतर अंतीम मसुदा पुन्हा मा. सर्वसाधारण सभेकडे अंतीम मान्यतेकरिता पाठविणेत येईल. सबब सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य उपविधी-२०१५ बाबतचे उपविधीचा मसुदा यास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ९-९-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज २०४ ठ. क्र. २२६
दि. ९/५/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव २०४
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

जुना कुंभार रोड, आकाशवाणी केंद्राजवळील गवळी वस्ती मध्ये मारुती मंदिर समोरील चौकास **गवळी वस्ती चौक** असे नामकरण करण्यांस व नामफलक लावण्याचे कार्यक्रमास येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 20८ ठ. क्र. 224
दि. 9819019५ राजी ठेवला खालील प्रोे. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ३८,३९,४२ मधील कुमठा नाका ते नई जिंदगी रोड तसेच अंत्रोळीकर नगर रोड ते रेणुकादेवी कॉम्प्लेक्स (संजय नगर) समोरील पत्की हॉस्पीटल समोरील चौक यांचे नामकरण करुन **जय विजय चौक** असे नामकरण करण्यांस, नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 299 ठ. 226
दि. 9/3/90/95 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २६ ब, २३ ब, २४ अ, २५ अ या चारही प्रभागामध्ये विहीरी म.न.पा.च्या ताब्यात घेऊन स्वच्छ करुन ४ इंची पाईप लाईन, ४ एच.पी. ची मोटार बसविणे यासाठी र.रु. ३०,०१,९१२/- इतकी याकामी करणेस प्लॅन व एस्टीमेट येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 2916 ठ. क्र. 229 दि. 9/10/15 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरात प्रथमच **४९ वी राष्ट्रीय अंजिक्यपद खो-खो स्पर्धा - २०१५** संपन्न होणार आहे. सदरची स्पर्धा ही सोलापूर जिल्हा ॲम्युचर खो-खो असोसिएशन तर्फे आयोजित करण्यात येणार आहे. या खो खो स्पर्धा दि.२२ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०१५ अखेर पार्क स्टेडीयमचे मैदानावर संपन्न होणार आहेत.

भारताच्या विविध राज्यातून, बहुभाषिक गुणवंत - किर्तीवंत - अष्टपैलू खो-खो पटू या राष्ट्रीय अंजिक्यपद स्पर्धेसाठी येणार आहेत. तेंव्हा त्यांच्या निवासाची, भोजनाची, प्रवासाची सोय करणे गरजेचे आहे. तसेच स्पर्धेतील विजेत्यांना भरघोस पारितोषिके देण्यात येणार असून त्यासाठी जवळपास ५० ते ६० लाख रुपये खर्च अपेक्षीत आहे.
तसेच स्पर्धे दरम्यान खेळाडूंना निवासस्थानावरुन मैदानावर येणे-जाणे करणेसाठी परिवहन समितीच्या बसेसची नितांत आवश्यकता आहे.

तरी सोलापूर शहरात पूर्वी कधीही न झालेल्या प्रथमच आयोजीत करण्यात आलेल्या ४९ वी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा - २०१५ च्या यशस्वी आयोजनासाठी र.रु.१०.०० लाखाचा निधी सोलापूर जिल्हा ॲम्युचर खो-खो असोसिएशन,सोलापूर यांना मिळणेस मान्यता देण्यात येत असून याकामी बजेट तरतूद करण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/ग्रामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 223 ठ. क्र. 230
दि. 9/4/90/95 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

२२३

सोलापूर शहर हद्दीतील कुमठा नाका ते नई-जिंदगी रोड व रेणूकादेवी कॉम्प्लेक्स (संजय नगर) अंत्रोळीकर नगर येथील पत्की हॉस्पीटल समोरील चौकास **जय विजय चौक** असे नामकरण करण्यांस मान्यता देण्यास व त्या नावाचे नामकरण करण्यांस येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

मालापूर महानगरपालिकच्या तहकूब/~~मासुली/विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२२६ ठ. क्र.२३१ दि. १४/१०/१५ राजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. १ मधील सम्राट चौक डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरच्या लगत कस्तुरे वकील यांच्या बोळात रस्ता डांबरीकरण करणे कामाचे प्रस्तावात नमूद कारणास्तव पूर्वगणनपत्रक क्र./२०१५-१६ र.रु. ७,५४,५७०/- इतकी बजेट तरतूद उपलब्ध होऊन मिळणेकामी मा. स्थापत्य समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ४-८-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ७३, दिनांक १४-९-१५ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
मालापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रमुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 226 ठ. क्र. 332
दि. 9/10/15 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ३५ अ मधील पीरसाब धट्टी येथील जुने सार्व. शौचालय पाडून त्या ठिकाणी नविन सुलभ शौचालय बांधणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २०१४-१५ र.रु. २०,२६,६८५/- यांस मा. स्थापत्य समितीची मान्यता मिळून मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. २८-८-१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ७९, दिनांक १४-९-१५ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रकरणी कार्यवाही करणेपूर्वी आवश्यक त्या मे. कोर्टात कॅव्हेट दाखल करणेची कार्यवाही करणेत यावी.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 228 ठ. क्र. 233
दि. 9/11/2015 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्र. ४२ मध्ये अनुराधा व प्रगती सोसायटी येथे सिमेंट कॉँक्रीट रस्ता, पिण्याचे पाण्याची पाईप लाईन इ. कामे करणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २०१५-१६ र.रु. २४,४८,३६०/- यांस मा. स्थापत्य समितीची मान्यता मिळून मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १३-६-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. ८०, दिनांक १४-९-१५ चे शिफारसी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~अंदाजपत्रक/स्थायी/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 229 ठ. क्र. 234
दि. 31/10/15 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

प्रभाग क्र. ४० अ थोबडे रिक्षा स्टॉप ते शरण मठापर्यंत १२ इंची व्यासाची पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन घालणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. १६/१५-१६ र.रु. २१,९७,५५१/- इतकेचे तयार केले असून, यांस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १४-८-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका